**<u>ठळक बातम्या</u>**

- आर्थिक वर्ष २०२४- २५ मधे भारताचा प्रत्यक्ष स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडेसहा टक्के राहण्याचा अंदाज

- राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण, जळगाव जिल्ह्यातल्या सुजाता अशोक बागूल पुरस्कारानं सन्मानित

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारमधे ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत विविध प्रकल्पांचा प्रारंभ

- ईशान्येकडच्या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, आसामला उद्यापर्यंत रेड अलर्ट जारी

**आणि**

- आशियाई ॲथलेटिक्स  चॅम्पियनशिप स्पर्धेत गुलवीर सिंगनं पटकावलं दुसरं सुवर्णपदक, पदकतालिकेत भारत दुसऱ्या स्थानावर

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२४- २५ मधे भारताचा प्रत्यक्ष स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडेसहा टक्के राहील, असा अंदाज केंद्रीय सांख्यिकी विभागानं व्यक्त केला आहे. या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत ७ पूर्णांक ४ दशांश टक्के दरानं वाढीचं अनुमान आहे.

या वर्षातला  एकंदर जीडीपी वाढीचा दर ९ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिला. बांधकाम क्षेत्राचा यात मोठा हातभार आहे. या क्षेत्राची अनुमानित वाढ ९ पूर्णांक ४ दशांश टक्के आहे. सार्वजनिक प्रशासन, संरक्षण, इत्यादी ८ पूर्णांक ९ दशांश

टक्के, तर वित्तीय-स्थावर मालमत्ता- व्यावसायिक सेवा, या क्षेत्रांची वाढ ७ पूर्णांक २ दशांश टक्के असल्याचं सांख्यिकी विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्लीत, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झालं. या पुरस्कार सोहळ्यात, राष्ट्रीय आरोग्य क्षेत्रात नि:स्वार्थ वृत्तीनं सेवा देणाऱ्या १५ परिचारिका आणि परिचारकांचा गौरव करण्यात आला. त्यात जळगाव जिल्ह्यातल्या कठोरा इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या सहायक परिचारिका आणि मिडवाइफ सुजाता अशोक बागूल यांचा समावेश आहे. बागूल यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १८ वर्षांच्या अतुलनीय आरोग्य सेवेसाठी त्यांना हा सन्मान मिळाला. एक लाख रुपये रोख, आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, आणि राज्य मंत्री प्रतापराव जाधव, अनुप्रिया पटेल, तसंच आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधल्या काराकट इथं ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली. यात साडेपाच हजार कोटी रुपयांचा चौपदरी पाटणा - गया - दोभी महामार्ग, २४९ कोटींचा गोपालगंज महामार्ग यांचाही समावेश आहे. रालोआ सरकार बिहारच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील आहे, लोकांपर्यंत शांतता, सुरक्षा आणि शिक्षण पोहोचवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**- - होल्ड - बाईट मोदी - -**

वाहतूक, ऊर्जा, रेल्वे आदी क्षेत्रांना या प्रकल्पांमुळे लाभ होणार आहे. या कार्यक्रमाच्या सुरक्षेसाठी ५ हजार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राज्यपाल आरिफ मोहम्मद खान या कार्यक्रमाला उपस्थित होते.
त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी उत्तरप्रदेशात कानपूर इथं ४७ हजार ५७३ कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. तसंच चुन्नीगंज आणि नयागंज दरम्यानच्या मेट्रो कॅरीडॉरला हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><>**

संरक्षण मंत्रालयानं म्युनिशन्स इंडिया लिमिटेड, आर्मर्ड व्हेइकल्स निगम लिमिटेड आणि इंडिया ऑप्टेल लिमिटेड यांना मिनीरत्न श्रेणी-१ दर्जा मंजूर केला आहे. केवळ तीन वर्षात सरकारी संस्थांमधून नफा कमावणाऱ्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये रूपांतरित झाल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तिन्ही सार्वजनिक क्षेत्रातल्या संरक्षण उपक्रमांचं अभिनंदन केलं. कंपनीची उलाढाल वाढवण्यासाठी, संपूर्ण स्वदेशीकरण करण्यासाठी आणि मिनीरत्न दर्जा प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर निकषांची या तिन्ही संस्थांनी पूर्तता केल्याबद्दल सिंह यांनी समाधान व्यक्त केलं. मिनीरत्न दर्जा मिळाल्यामुळे या कंपन्यांना वेगवान वाढीचा मार्ग गाठायला आणि संरक्षण उत्पादन आणि निर्यातीत नवीन उंची गाठायला मदत होईल, असा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

शाश्वत आणि नैसर्गिक शेतीकडे वळण्याचा बायोचार हा उत्तम मार्ग आहे, असं केंदीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. ॲग्रोव्हिजन फाऊंडशनने नागपूर इथं आयोजित केलेल्या बायोचार निर्मिती प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण कार्यशाळेत ते आज बोलत होते. पिकांचे अवशेष जाळून तयार केलेल्या कोळशासारख्या पदार्थाला बायोचार म्हणतात. शेतीमध्ये नवनव्या यंत्रांचा वापर केला आणि उत्पादन

वाढलं, तर शेतकऱ्यांना नैराश्य येणार नाही. काळाच्या ओघात शेतकऱ्यांनाच आपल्या विकासाचा मार्ग शोधावा लागेल, असंही गडकरी म्हणाले.

**<><><><><>**

नैऋत्य मान्सूनमुळे ईशान्येकडच्या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. आसाममध्ये, राजधानी गुवाहाटीमध्ये  पुराचा धोका निर्माण झाला आहे, ब्रह्मपुत्रा आणि इतर प्रमुख नद्या धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहेत, यामध्ये भरालू आणि बहिनी या नद्यांचा  समावेश  आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दलानं गुवाहाटीच्या अनेक सखल भागात रहिवाशांना मदत करण्यासाठी रबर बोटी तैनात केल्या आहेत. धुबरी, दक्षिण सलमारा-मानकाचर, गोलपारा आणि दिमा हासाओ या जिल्ह्यांमध्ये अचानक पूर, भूस्खलन आणि गंभीर पाणी साचण्याचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागानं उद्यापर्यंत आसामला  रेड अलर्ट जारी केला आहे,

**<><><><><>**

आशियाई अथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत गुलवीर सिंगने दुसरे सुवर्णपदक जिंकल्यामुळे भारताने देशांच्या पदकतालिकेत आघाडी घेतली आहे. भारत सध्या आठ सुवर्ण, सात रौप्य आणि तीन कांस्य अशा एकूण १८ पदकांसह पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. तर चीन १५ सुवर्ण, आठ रौप्य आणि तीन कांस्यपदकासह पहिल्या स्थानावर आहे.

गुलवीरनं पुरुषांच्या ५ हजार मीटर शर्यतीत १३ मिनिटे २४ सेंकद ७८ मिनी सेंकद अशा विक्रमी वेळेत विजेतेपद पटकावलं. याईधी त्यानं या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी १० हजार मीटर शर्यतीत पहिलं सुवर्णपदक जिंकलं होतं.

महिलांच्या उंच उडीत, १८ वर्षीय पूजानं १ मीटर ८९ सेंटीमीटर अशी उंच उडी मारून सुवर्णपदक जिंकलं.

त्यानंतर नंदिनी अगासराने महिलांच्या हेप्टाथलॉनमध्ये ५ हजार ९४१ गुणांसह सुवर्णपदक पटकावलं.

पारुल चौधरीनं महिलांच्या ३ हजार मीटर स्टीपल चेसमध्ये ९ मिनिटे १२ सेंकद ४६ मिनि सेकंद अशी विक्रमी वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकलं. अनिमेश कुजूरनं २० मिनिटे ८१ सेकंदांसह पुरूषांच्या २०० मीटर स्पर्धेत उपांत्य फेरीत दुसरं स्थान मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><>

पाकिस्तानकडून झालेल्या गोळीबारामुळे प्रभावित झालेल्या नियंत्रण रेषेजवळच्या रहिवाशांसाठी विशेष मदतीची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केली. या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना नियुक्तीपत्रांचे वाटप केल्यानंतर पूंछ शहरात एका मेळाव्याला संबोधित करताना गृहमंत्री बोलत होते. सध्याच्या ९० हजार भूमिगत बंकर्स व्यतिरिक्त, या भागातल्या लोकांची सुरक्षा आणखी मजबूत करण्यासाठी अतिरिक्त पावले उचलली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><>

उत्तर प्रदेशातल्या जौनपूर जिल्ह्यात आज सकाळी बादलपूरहून जौनपूरला जाणारी एक खाजगी बस उलटल्यानं किमान चार जणांचा मृत्यू आणि १५ जण जखमी झाले. चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला.

<><><><>

दहशतवादापासून आपल्या नागरिकांचं संरक्षण करण्याचा भारताचा अधिकार आता संपूर्ण जग मान्य करत आहे, असं मत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज व्यक्त केलं. ते आज गोव्यात आयएनएस विक्रांतवर आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. पाकिस्ताननं स्वतःच्या हातांनी त्यांच्या भूमीवर कार्यरत असलेल्या

दहशतवादाची समूळ नष्ट करायला हवीत, तसंच हाफिज सईद आणि मसूद अझहर सारख्या दहशतवाद्यांना भारताच्या स्वाधीन करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या बाद फेरीत आज चंदिगड इथं मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ८ व्या षटकात १ बाद ८४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**